MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात







# शरद पवारांच्या सभेनं पंकजाताई धनंजय भाऊची धकधक वाढली..?

- बीड जिल्हा नेहमीच शरद पवारांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिलेला जिल्हा म्हणून बीडची ओळख
- पंकजाताई मुंडे यांचे जवळचे कार्यकर्तेच पंकजाताईंसाठी विरोधकांसारखे वागू लागले
- पंकजाताई चांगल्याच पण जवळचे बगलबच्चे यांच्यामुळे मतदानाचा टक्का कमी होत आहे का?
- शरद पवार यांना नेते स्वर्गीय विनायकराव मेटे यांचे समर्थक ही सखी साथ देणार उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना काँग्रेस राष्ट्रवादी मानवी हक्क अभियान डी पी आय ची ताकद शरद पवारांसोबतचं
- मातंग मुस्लिम मराठा ओबीसी अनेक संघटना पक्ष संघटना शरद पवारांसोबत बजरंग सोनवणे साठी मराठा समाज गावोगावी पेटून उठला.
- बहिण भाऊ एकत्र झाल्याने अनेक कार्यकर्ते शरद पवारांच्या संपर्कात.?
- तर धनंजय मुंडे शरद पवारांच्या सभेनंतर काय करणार बीड जिल्ह्यामध्ये चर्चाजोर धरू लागले
- अंबाजोगाई परळी केज माजलगाव आष्टी गेवराई पाटोदा बीड शिरूर येथील दिगज कार्यकर्ते शरद पवारांच्या गळाला?
- शरद पवारांच्या सभेने बीड लोकसभेचे समीकरण बदलण्याची संकेत.?
- मराठा आरक्षणामुळे मराठा समाजासह दलित मुस्लिम मराठा समाज एक वाटला बजरंग सोनवणे याला नक्कीच मोठ्या मताधिक्यांचा फायदा.
- अनेक दलित मुस्लिम मराठा बहिण भाऊ नेते फोडण्याच्या तयारीत असताना शरद पवारांनी सभेचं आयोजन केलं, पंकजा मुंडे धनंजय मुंडे यांचे शिलेदार पवारांच्या गळाला लागण्याची शक्यता?







## अशी असेल पार्किंग व्यवस्था

नगर रोडच्या बाजुने येणारी वाहने- पाठक मंगल कार्यालय, चर्हाटा फाटा, बीड
गेवराई कडून येणारी वाहने- महालक्ष्मी चौक, बायपास, बीड
बार्शी रोडच्या बाजुने येणारी वाहने - लॉ-कॉलेज, बार्शी रोड, बीड
तेलगाव रोडच्या बाजुने येणारी वाहने- व्हीआयपी लॉन्स, तेलगाव रोड, बीड
खंडेश्वरी मंदीराकडून येणारी वाहने- खंडेश्वरी मंदीरासमोरील क्रीडांगण.

## बीडमध्ये उद्या शरद पवारांची तोफ धडाडणार
## बजरंग सोनवणेंसाठी बीडमध्ये जाहीर सभा
## मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन

शरद पवारांचा मुक्काम म्हणजे बीड जिल्ह्यामध्ये आजपर्यंत इतिहास घडविण्यासाठी मुक्काम झाला आणि त्या मुक्कामातून विरोधकांचा समाचार घेत शरद पवारांनी आजपर्यंत बीड जिल्ह्यामध्ये इतिहास घडवलेला आहे या अगोदर सुद्धा बीड जिल्ह्यामध्ये गेल्या अनेक निवडणुकांमध्ये ते राष्ट्रवादीचे माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांच्या निवासस्थानी मुक्काम करायला थांबून त्या ठिकाणावर त्यांनी अनेक राजकीय फासे टाकत विरोधकांच्या मोहऱ्यांना आपल्याशी करून घेण्यामध्ये शरद पवार माहीरतर शरद पवार यांनी येणाऱ्या काळामध्ये पंकजाताई मुंडे यांच्या निकटवर्ती यांची संपर्क साधण्याची चर्चा सध्या जवळ धरू लागली आहे आणि मोहरे हे पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे यांच्या जवळचे शरद पवारांच्या गटाला लागण्याची दाट शक्यता वर ठेवली जात आहे.

आमदार संदीप क्षीरसागर यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीची धुरा योग्य पद्धतीने हाताळत बीड लोकसभे च्या वातावरणात ब जरंग मेहनत घेत आमदार संदीप जबाबदारी स्वीकारली पण ही जबाबदारी कमी वयामध्ये जास्त अनुभव असलेली आहे आमदार संदीप क्षीरसागर यांचा अनुभव हा स्वर्गीय केशर काकू यांच्या विचारावती राजकारण करत बीड जिल्ह्यातील जनतेला शरद पवारांच्या विचारधारेपासून काय फायदा



जिल्ह्याला होऊ शकतो हे संदीप क्षीरसागर आणणे सांगून बीड जिल्ह्यामध्ये बजरंग बप्पा सोनवणे साठी अहोरात्र फिरत असताना यावेळी त्यांच्यासोबत मुस्लिम समाजाचे नेते व माजी आमदार सय्यद सलीम साहेब शिवसेनेचे सुनील धांडे शेठ निजाम सह शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गणेश दरेकर परमेश्वर सातपुते सह मातंग समाजाचे नेते मिलिंद आव्हाड अजिंक्य चांदणे आम आदमी पार्टीचे अशोक येणे सह सर्व जाती धर्मातील नेते मंडळी यांना सोबत घेत संदीप शिरसागर यांनी बजरंग बप्पा सोनवणे यांच्यासाठी रात्र मेहनत करत बीड येथील सभेमध्ये बहुमताने विजय करण्यासाठी शरद पवार साहेब यांच्या नेतृत्वाखाली बैठक आयोजित करण्यात येत आहे यावेळी या सभेला हजारोची संख्येने उपस्थित लोक राहत असतानाच बीडच्या लोकसभेचे समीकरण बदलण्याची शक्यता व बजरंग सोनवणे यांना या या सभेचा नक्की फायदा होईल अशी चर्चा जिल्ह्यामध्ये सध्या जोरदार लागले आहे इंडिया आघाडीचे राष्ट्रीय नेते शरद पवार यांची उद्या बीडमध्ये जाहीर सभा होणार

### पत्रकार, महिलांसाठी असणार विशेष व्यवस्था

या सभेसाठी उपस्थित असणाऱ्या पत्रकार बांधव व महिलांसाठी विशेष बैठक व्यवस्था असणार आहे. तसेच उष्णतेचे प्रमाण जास्त असल्याने थंड पाणी आणि पंख्याची व्यवस्थाही यावेळी करण्यात आली आहे.

आहे. बीड लोकसभा मतदारसंघातून उमेदवार असलेले बजरंग सोनवणेंसाठी शरद पवार सभा घेणार आहेत. या सभेसाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून करण्यात आले आहे.

बीड लोकसभा निवडणुकीकडे संपूर्ण महाराष्ट्राचेच नव्हे तर देशाचे लक्ष लागून आहे. येत्या सोमवारी म्हणजेच १३ मे रोजी बीड लोकसभा मतदारसंघाचे मतदान होणार आहे. या अनुषंगाने बीड लोकसभा मतदारसंघातून इंडिया आघाडी तसेच महाविकास आघाडीचे उमेदवार असलेले बजरंग सोनवणे यांच्यासाठी शनिवारी (दि.११) रोजी शरद पवार यांची बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण (मल्टीपर्पज ग्राउंड) येथे दुपारी ३ वा. जाहीर सभा होणार आहे. या सभेची जबाबदारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांच्याकडे आहे. सध्या सभेचे नियोजन सुरू आहे. स्वत: आ.संदीप क्षीरसागर नियोजनाची सुत्र सांभाळून आहेत.

# महावितरणने वीजेची मान्सुनपुर्व देखभाल व दुरुस्तीची कामे करावी

## लोंबकळणा-या तारा व उघड्या रोहित्रांमुळे अपघाताची दाट शक्यता :- डॉ.गणेश ढवळे

बीड (प्रतिनिधी)

पावसाळ्यात वीजग्राहकांना अखंडीत व योग्य दाबाने वीजपुरवठा सातत्याने मिळावा याकरिता बीड जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील वीजेची मान्सुनपुर्व देखभाल व दुरूस्तीची रोहित्रांची तपासणी,अर्थिंग व टर्मिनल कनेक्शन चेक करणे,वीजतारांजवळील झाडांच्या फांद्यांची छाटणी,लोंबकळणा-या तारांचे झोल काढणे तसेच उघड्यावरील रोहित्रांची सुरक्षितता आदि मान्सुनपुर्व देखभाल व दुरूस्तीची कामे मे महिन्याच्या उत्तरार्धात तातडीने करण्यात यावीत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड, कार्यकारी अभियंता महावितरण विभाग बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, ऊर्जामंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना निवेदनाद्वारे केली आहे.

सध्या महावितरणच्या वीज वितरण यंत्रणेतील बहुतांश सामग्री उघड्यावर असल्याने वातावरणात होणा-या बदलांचा प्रतिकूल परिणाम वीज वितरण यंत्रणेवर होत असतो पर्यायाने त्याचा परिणाम परीणाम ग्राहक आणि ग्राहक सेवांवर होत असतो.यामुळे उन्हाळा, अवकाळी पाऊस व त्यानंतर लगेचच सुरू होणारा पावसाळा हा वीज ग्राहकांना सुसह्य व्हावा यासाठी महावितरणने सैल झालेले गार्डींग व स्पन घट्ट करणे,दोन खांबामधील झोल पडलेल्या तारा ओढून घेणे,सर्व खांब आणि त्यांचे ताण सुस्थितीत करणे अपेक्षित आहे.वीज रोहित्रांची तपासणी करून तेलाची योग्य पातळी राखणे, स्टे वायरने वीजखांबांचा आधार मजबूत करणे,रोहित्रांचे अर्थिंग मजबुत करणे,पोल,वितरण पेट्या,फिडर



पिलर्स,मिनी फिडर पिलर्स या सर्वांचे अर्थिंग सुस्थितीत करणे, वीज तारांजवळील झाडांच्या फांद्यांची छाटणी करणे ,फुटलेले पिन आणि इन्सुलेटर बदलणे, तपासणी व दुरुस्ती करणे,वाहिन्यांचे खराब झालेले लाइटनिंग अरेस्टर बदलणे, भुमिगत वाहिन्यांचे तात्पुरते असलेले जाईंट कायमस्वरूपी करणे, वाहिन्यांचे खराब झालेले जंपर बदलणे, जीर्ण झालेल्या वायर बदलणे , पावसाचे पाणी साचणा-या परीसरातील फिडर पिलरची जमिनीपासून उंची वाढवणे आदि मान्सुनपुर्व देखभाल व दुरूस्तीची कामे मे महिन्याच्या उत्तरार्धात तातडीने करण्यात यावीत अशी मागणी करण्यात आली आहे.

लोंबकळणा-या तारा व उघड्या रोहित्रांमुळे जिविताला धोका

बहुतांश रोहित्र उघड्यावर असुन त्यांना संरक्षक कवच नसल्याने पावसाळ्यात निर्माण झालेला हिरवागार चारा चरण्यासाठी आलेली जनावरे विद्युत प्रवाहाचा धक्का लागुन दगावल्याच्या दुर्दैवी घटना घडलेल्या आहेत. तसेच लोंबकळणा-या तारांमुळे अपघाती घटना घडलेल्या आहेत त्याची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

ग्रामीण भागातील रोहित्रांची दुरावस्था ; साहित्याची वानवा

ग्रामीण भागातील रोहित्रांची अत्यंत दुरावस्था असुन महावितरण कडुन आवश्यक साहित्य पुरवण्यात येत नसल्याने ग्रामस्थांनाच रात्री अपरात्री वीज गेल्यावर फ्युज टाकावे लागते. महावितरणचे कर्मचारी यांना सुद्धा हॅन्ड ग्लोज तसेच ईतर आवश्यक साहित्य मिळत नसल्याचे वास्तव आहे.त्यामुळे महावितरणने आवश्यक साहित्य पुरवण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

# अक्षरा मस्के चे आयसीएसई दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश

बीड (प्रतिनिधी)

अक्षरा तत्त्वशील मस्के या विद्यार्थिनीने आयसीएसई दहावी बोर्ड परीक्षेत ९४ टक्के गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले. यामुळे तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देण्यात येत आहे. अक्षरा



मस्के ही बीड शहरातील राजुरी वेस भागात राहणारे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांची नात असून ती ब्ल्यूरिज पब्लिक स्कूल, हिंजवडी, पुणे येथे शिक्षण घेत आहे. अभ्यासात हुशार असल्याने तिने इयत्ता दहावीच्या आयसीएसई बोर्ड परीक्षेत ९४ टक्के गुण मिळवून घवघवीत यश प्राप्त केले आहे. तिने मिळविलेल्या या यशामुळे तिच्यावर शाळेचे प्राचार्य, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, बीड-पुणे येथील गंगाधरे-मस्के परिवार, नातेवाईक, मित्रआप्तेष्ट यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांनी दिलेले प्रेम आणि योगदान कुंभार समाज कदापीही विसरणार नाही -अर्जुन दळे

## पंकजाताई मुंडे यांच्या मागे बीड जिल्ह्यातील कुंभार समाज ताकदिनीशी पाठीशी

बीड (प्रतिनिधी)

स्व.गोपीनाथराव मुंडे साहेब हे उपमुख्यमंत्री असतांना दि.२ एप्रिल १९९७ रोजी कुंभार समाजाचा मुंबई येथील विधानभवनावर काढण्यात आलेला सुमारे ४० हजार समाज बांधवांचा मटका फोड मोर्चाला सामोरे येवून त्यावेळी सभागृहात चालू असलेले कामकाज बाजुला ठेवून त्यांनी कुंभार समाजाच्यावतीने काढण्यात आलेल्या या मोर्चाला पाठींबा देत समाजाचे निवेदन स्विकारुन कुंभार समाजाचे प्रश्न समजावून घेत सभागृहात आवाज उठवून मातीवरील रॉयल्टी माफीची सवलत देण्याची घोषणा करुन या न्याय मागणीचा तातडीने शासन निर्णय काढण्याचे प्रशासनाला आदेश दिले. वर्षानुवर्षे चालत असलेला कुंभार बांधवांच्या व्यवसायाला उभारणी देणारा मातीसाठीचा प्रश्न निकाली काढला. त्यामुळे आजही कुंभार समाज स्व.गोपीनाथराव मुंडे यांनी समाजाला दिलेल्या योगदान कधीही विसरणार नाही. कुंभार समाज बीड लोकसभेच्या निवडणूकीत उभ्या असलेल्या त्यांच्या कन्या पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या पाठीशी




खंबीरपणे उभे रहाणारच आहे अशी ग्वाही कुंभार समाजाचे प्रदेश सरचिटणीस तथा बीड जिल्हाध्यक्ष अर्जुन दळे यांनी दिली आहे.प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे की, स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांनी अत्याल्प असलेल्या कुंभार समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्याचे काम केले आहे. कुंभार समाजाला त्यांनी दिलेले योगदान कधीही समाज विसरणार नाही. स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या विचारांचा वारसा पंकजाताई मुंडे या चालवत आहेत. पंकजाताईंनी देखील छोट्या-छोट्या समाजाला बळ देण्याचे आश्वासित केले आहे. त्यामुळे कुंभार समाज हा भक्कमपणे पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी उभा रहाणार आहे. पंकजाताई मुंडे यांनी कायम जिल्ह्याचा विकास डोळ्यासमोर ठेवून काम केले. त्यांच्या पालकमंत्री पदाच्या कार्यकाळात त्यांनी विकास हेच ध्येय समोर ठेवून जिल्ह्यात काम केले. स्वपक्षाच्या कार्यकर्त्यांसह इतर विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांचाही सन्मान केला. विकास कामात कधीही राजकारण आड येवू दिले नाही, त्यांनी समाजातील सर्व जातीधर्माच्या लोकांना सोबत घेतले आहे. त्यामुळेच कुंभार समाज देखील पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी खंबीर उभा राहून प्रचंड मोठे मताधिक्य देणार असल्याचा विश्वास कुंभार समाजाचे प्रदेश सरचिटणीस तथा बीड जिल्हाध्यक्ष अर्जुन दळे यांनी व्यक्त केला आहे.

# माजलगाव धरणातून सिंदफणा नदीत पाणी सोडण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात - धनंजय मुंडे

माजलगाव (प्रतिनिधी)

माजलगाव धरणातून सिंदफणा नदीत पाणी सोडण्यात यावे, याबाबत माजलगाव तालुक्यातील काही गावातील ग्रामस्थांनी पालकमंत्री धनंजय मुंडे यांना निवेदन दिले होते, त्यानुसार नदीत पाने सोडण्यात यावे याबाबत जलसंपदा विभागाचे सचिव दीपक कपूर यांना सूचना केल्या असून, पाणी सोडण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.



माजलगाव तालुक्यातील लुकेगाव, शिंपेटाकळी, रोशनपुरी, नागडगाव, गोविंदपूर, सांडस चिंचोली आदी गावातील नागरिकांनी पालकमंत्री धनंजय मुंडे, आ.प्रकाशदादा सोळंके यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली होती. दरम्यान धनंजय मुंडे व आ.प्रकाशदादा यांनी जलसंपदा विभागाचे सचिव दीपक कपूर तसेच जलसंपदा विभागाच्या अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांशी याबाबत चर्चा केली असून, त्यांना पाणी सोडण्याच्या सूचना केल्या आहेत. जलसंपदा विभागामार्फत पाणी सोडण्याबाबतचे आदेश व अन्य प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, लवकरच पाणी सोडण्यात येईल, असेही धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. त्यामुळे वरील गावांचा पाणी प्रश्न लवकरच सुटणार आहे.

जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेचाही पालकमंत्र्यांकडून आढावा

दरम्यान बीड जिल्ह्यात अनेक भागात दुष्काळ सदृश परिस्थिती असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनलेला असताना प्रशासनाकडून पाण्याचे टँकर्स सुरू करण्यात आले आहेत. अधिग्रहित जलसाठे व स्रोत, लोकसंख्येच्या प्रमाणात टँकर्सची उपलब्धता, टँकर्सच्या खेपा आवश्यकतेनुसार वाढवणे, यांसह विविध बाबींचा पालकमंत्री धनंजय मुंडे हे दर आठवड्याला आढावा घेत असून, योग्य त्या सूचना देत आहेत. निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू असल्याने प्रशासनासोबत बैठका घ्यायला मर्यादा असल्या तरी दूरध्वनी वरून संपर्क करून पाणी टंचाई व उपाययोजना याबाबत धनंजय मुंडे हे सातत्याने पाठपुरावा करत आहेत.

# नफरवाडी येथे तालुका विधी सेवा समिती आणि पाटोदा वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने कायदा आणि शासकीय विविध योजना शिबीर संपन्न

पाटोदा (प्रतिनिधी)

तालुका विधी सेवा समिती आणि वकील संघ पाटोदा यांच्या संयुक्त विद्यमाने आज दिनांक १० मे २०२४ अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर शासकीय विविध योजना आणि कायदेविषयक माहिती शिबिर संपन्न झाले .या शिबिराचे अध्यक्ष श्री एस. बी. कवठेकर (अध्यक्ष वकील संघ पाटोदा) तर प्रमुख पाहुणे श्री बी एस. राख .(विस्तार अधिकारी पंचायत समिती पाटोदा) तसेच श्री यु डब्ल्यू नेटके (कृषी अधिकारी पंचायत समिती पाटोदा) विधीज्ञ सुधीर घुमरे यांच्या उपस्थितीत पार पडले या प्रसंगी सर्वप्रथम मान्यवरांचे स्वागत शाल श्रीफल देऊन नफरवाडीचे सरपंच सौ. विद्या बंडू सवासे तसेच ग्रामपंचायत सदस्य महिला व पुरुष यांच्यातर्फे करण्यात आले. शिबिराला उपस्थित असणारे विस्तार अधिकारी श्री राख साहेब यांनी केंद्राच्या आणि राज्याच्या विविध योजनांची सविस्तर माहिती नागरिकांना दिली जवळजवळ ३५ योजना ग्रामीण जलसिंचन योजना सौर ऊर्जा पिक विमा अट्टल निवृत्तीवेतन घरबसल्या शासकीय प्रमाणपत्र काढता येतात हेही सांगितले.

दुसरे प्रमुख पाहुणे नेटके साहेब कृषी अधिकारी पाटोदा यांनी जलसिंचनांच्या योजना पाणी संवर्धन वगैरे योजनांची नागरिकांना माहिती दिली तर उपस्थित असणारे वकील श्री सुधीर घुमरे पीडित लोक यांच्यासाठी असणाऱ्या कायद्यांची माहिती तसेच सिड हल्ला झालेल्या तरुणीसाठी पाच लाखापर्यंतची मदत



शासनाची मिळू शकते याची माहिती दिली.या कार्यक्रमासाठी गावातील सौ विद्या बंडू सवासे सरपंच उपसरपंच सौ शितल तांबे बचत गट अध्यक्ष सौ कमल चव्हाण तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य प्रतिष्ठित नागरिक तरुण वर्ग या कार्यक्रमाचा उपस्थित होता या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विधिज्ञ एस बी जावळे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री संजय सावंत सर यांनी केले चहापानानंतर कार्यक्रमाचे सांगता करण्यात आली.



**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

**वंचित बहुजन आघाडी अंबाजोगाई शहर अध्यक्ष गोविंद आबा मस्के यांच्या वडिलांचे अल्पशः आजाराने दु:खदनिधन झाले. बीड लोकसभेच्या प्रचार दौऱ्यात वेळात वेळ काढून अशोक हिंगे पाटील यांनी कबीर नगर मस्के कुटुंबीयांच्या घरी सांत्वन भेट दिली. त्याप्रसंगी जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे, बालाजी जगतकर, अजय सरवदे,धम्मानंद कासारे, बिभीषण चाटे,अनिल डोंगरे,बाबुराव मस्के, अरूण बनसोडे, परमेश्वर लांडगे, चांदभाई, स्वप्निल ओव्हाळ, अभिप्राय मस्के आदी उपस्थित होते.**

# प्रहारचे परळी तालुकाध्यक्ष विष्णू आरसुळे यांचा धनंजय मुंडेंच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश



परळी (प्रतिनिधी)

प्रहार जनशक्ती पक्षाचे परळी तालुका अध्यक्ष तथा कौडगाव हुडा ग्रामपंचायत सदस्य विष्णू आरसुळे यांनी आज प्रहार पक्षाला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा महाराष्ट्राचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. विष्णू आरसुळे हे मागील काही वर्षांपासून प्रहार पक्षाचे परळी तालुक्यात काम करत असून आता आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व महायुतीला बळकट करण्यासाठी काम करणार असल्याचे विष्णू आरसुळे यांनी म्हटले आहे. तर धनंजय मुंडे यांनी त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात स्वागत करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी शितलदास आरसुळे यांसह पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# वंचित चे अशोक हिंगेचा झंझावती प्रचार दौरा; परळी तालुका काढला पिंजून

## मुस्लिमांना गृहीत धरून मतदान मागणाऱ्या महाविकास आघाडीला मतदान का करायचे - मुजमिल पटेल यांचा सवाल !

**बीड (प्रतिनिधी)**

**महाविकास आघाडीचे नेते शरदचंद्र पवार स्वत:ला पुरोगामी म्हणून घेतात आणि दरवेळी मुस्लिम समाजाची फसवणूक करतात अशा महाविकास आघाडीच्या डमी उमेदवार ला मतदान का करायचे असा सवाल करत वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अशोक हिंगे पाटील यांना गॅस सिलेंडर समोरील बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करा आशावान मुजमील पटेल यांनी केले आहे. परळी येथील बरकत नगर,नागापुर,टोकवाडी, वानटाकळी,दवनापुर,नाग पिंपरी,वाघाळा,सिरसाळा, माडेखेल येथे मत दारांशी संवाद साधत होते.**

पुढे बोलताना मुजमिल पटेल म्हणाले की राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्वतःला पुरोगामी म्हणून घेतो मात्र महाराष्ट्रातील एकाही मुस्लिम कार्यकर्त्याला महाराष्ट्रत खासदारकीला उमेदवारी देत नाही म्हणजे यांचा मुस्लिम समाजावर विश्वास नाही किंवा यांचे पुरोगामी



पण नाटके आहे शरद पवार तडजोडीचा राजकारण करतात त्यामुळे बीड जिल्ह्यात लोकसभेसाठी दिलेला उमेदवार हे सुद्धा एक तडजुडीच प्रतीक आहे म्हणून प्रत्येक वेळी मुस्लिम समाजाला गृहीत धरायचं वापरून घ्यायचं आणि पुन्हा वाऱ्यावर सोडून द्यायचं असं धोरण राबवणाऱ्या फसव्या राष्ट्रवादी महाविकास आघाडीला मुस्लिम समाजाने का मतदान करायचं असा प्रश्न उपस्थित करून मुजमील पटेल यांनी वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार तरुण तडफदार चळवळीचे तारणहार अशोक हिंगे पाटील यांच्या गॅस सिलेंडर समोरील बटन दाबून प्रचंड मताधिक्याने विजयी करावे असे आव्हान केले. यावेळी मुजमील पटेल यांच्यासोबत वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी परळी तालुक्यातील अनेक गावचा दौरा केला मतदार संघात संवाद साधला यावेळी मतदारातून वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांना वाढतात पाठिंबा मिळाला वंचित बहुजन आघाडी च्या बाबतीत मतदारांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्साह दिसून येत आहे. गोरगरीब बिन दुबळ्यांचा नेतृत्व करणारे प्रकाश आंबेडकर यांच्या हात बळकट करण्यासाठी अशोक हिंगे पाटील यांना संसदेत पाठवायचं असा निर्धार मतदारांनी बोलून दाखवला.

आज अशोक हिंगे यांच्यासोबत दौऱ्यात वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे, मिलिंद घाडगे, बालाजी जगतकर, गौतम आगळे, धम्मानंद कासारे, अजय सरवदे, मिलिंद डोंगरे, बाबुराव मस्के,प्रसन्नजीत रोडे, धम्मानंद साळवे, बिबीशन चाटे, गौतम साळवे, गफारशा खान, परमेश्वर लांडगे, अरुण बनसोडे, विष्णू मुंडे, साहेबराव रोडे, राजू भुतके, जिल्हा तालुका शहर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गोविंद मस्के कुटुंबीयांची सांत्वन भेट

वंचितांचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी वंचित बहुजन आघाडी अंबाजोगाई तील गोविंद मस्के यांच्या वडिलांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले होते, त्या निमित्ताने प्रचार दौऱ्यात वेळात वेळ काढत अंबाजोगाईतील संत कबीर नगर येथील घरी सांत्वन्तर भेट दिली त्याप्रसंगी त्यांच्यासोबत प्रचारात सहभागी सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# बजरंग सोनवणे थापाड्या; प्राथमिक आरोग्य केंद्राची मंजुरी राज्याचे आरोग्य खाते देत असते, जिल्हा परिषदेचा सभापती नाही - अजय मुंडे


## पंकजाताई पालकमंत्री, व धनुभाऊ विरोधीपक्ष नेता असताना नाथऱ्यात प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर - अजय मुंडेंची माहिती

### बजरंग सोनवणेनी फुकटचे श्रेय घेऊ नये

**परळी (प्रतिनिधी)**

**आमचे जन्मगाव नाथरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र बजरंग सोनवणे यांनी उभारले ही धादांत खोटारडे असून बजरंग सोनवणे हे थापा मारत आहेत. मुळात कुठलेही प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्याचा अधिकार हा राज्य शासनाच्या आरोग्य विभागाचा असतो. जिल्हा परिषदेच्या सभापतीचा त्यात तीळ मात्र संबंध येत नाही. त्यामुळे नाथ्याच्या प्राथमिक आरोग्य केंद्राचे फुकटचे श्रेय बजरंग सोनवणे यांनी घेऊ नये, असे प्रत्युत्तर बीड जिल्हा परिषदेचे गटनेते अजय मुंडे यांनी दिले आहे.**

२०१४ ते २०१९ या काळामध्ये विरोधी पक्ष नेते धनंजय मुंडे यांनी पाठपुरावा करून आणि बीड



जिल्ह्याच्या पालकमंत्री म्हणून पंकजाताई काम करत असताना तत्कालीन आरोग्य मंत्री दीपक सावंत यांच्या माध्यमातून नाथऱ्याचे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर झालेले आहे. त्यावेळी जिल्हा परिषदेकडून त्याचा प्रस्ताव पाठवणे व राज्य शासनाकडून त्याची मंजुरी आणणे यामध्ये पंकजाताईंसह तत्कालीन विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे यांचेही योगदान आहे. मात्र नाथऱ्याच्या प्राथमिक आरोग्य केंद्राशी बजरंग सोनवणे यांचा तीळ मात्र संबंध नाही. याबाबतचे पुरावे ही उपलब्ध आहेत अशी स्पष्टोक्ती अजय मुंडे यांनी केली आहे.

आपण केलेले कोणतेही विकासात्मक कामे आपल्याकडे सांगायला नाहीत, म्हणून केवळ जाहीर सभांमध्ये लोकांकडून टाळ्या पिटून घेण्यासाठी बजरंग सोनवणे हे नाथ्र्याचे प्राथमिक आरोग्य केंद्र आपण उभारले असल्याच्या बतावण्या करत आहेत. परंतु हे धादांत खोटे असून बजरंग सोनवणे यांनी फुकटचे श्रेय लाटू नये, असा इशारा अजय मुंडे यांनी दिला आहे.

# बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी बजरंग सोनवणे यांनाच मतदान करावे -शेख अजिमोद्दीन

कडा (प्रतिनिधी)

बीड लोकसभा निवडणूकीसाठी बीड जिल्ह्यातील सर्व परीस्थिती पहाता एखाद्या उमेदवाराला मतदान करावे लागेल किंवा नोटाचा वापर करावा लागेल म्हणून भाजपा वगळता एखादा उमेदवार निवडने आवश्यक आहे .भाजपाने २०१४ लोकसभा निवडणूक जाहीरनाम्यात शेतकऱ्यांना शेतीमालाला उत्पादन खर्चअधिक पन्नास टक्के नफा व शेतकरी कर्जमुक्त करू असे आश्वासन दिले होते. परंतु त्यावर त्यांनी अंमलबजावणी केली नाही म्हणून शेतकरी संघटनेने सर्वोच्च न्यायालयात जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करावी म्हणून याचीका दाखल केली. त्यावर मोदी सरकारने सर्वोच्च न्यायालयात आम्ही शेतीमालाला उत्पादनखर्च अधिक पन्नास टक्के नफा देणारं नाहीत असे शपथपत्र सादर केले आहे. चूनावी जूमला व निवडणूक प्रचाराचा भाग आहे असे सांगितले.शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार नाहीत तसेच निवडणूक प्रचाराचा हा एक भाग त्यात न्यायालय हस्तक्षेप करू शकत नाही म्हणून याचीका निकाली काढण्यात आली.त्यामुळे भाजपा उमेदवाराला मतदान करू नये हे निश्चित आहे. म्हणून सर्व परीस्थिती पहाता



बीड लोकसभा निवडणूकीसाठी बजरंग सोनवणे यांनी शेतकरी विरोधी कायदे,कांदा निर्यात बंदी , शेतीमालाला रास्त भाव हे विषय लोकसभेत मांडण्याचे आश्वासन दिले आहे. म्हणून यांच्यावर एकदा विश्वास ठेवून पाहू .करीता बीड जिल्हा शेतकरी संघटनेने फक्त बीड जिल्ह्यात बजरंग सोनवणे यांना सहकार्य करण्याचे ठरवले आहे. तरी मी शेतकरी संघटना बीड जिल्हाध्यक्ष बीड जिल्ह्यातील सर्व शेतकरी, शेतमजूर, संघटनेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांना आव्हान करतो कि या लोकसभा निवडणूकीसाठी आपण सर्वांनी बजरंग सोनवणे यांना सहकार्य करायचे आहे व जास्तीत जास्त मतदान करून घ्यायचे आहे.असे आव्हान शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष शेख अजिमोद्दीन यांनी केले आहे.

# जरा सांभाळून रहा ,काळजी घ्या ,उष्माघात ही वैद्यकिय आणीबाणी आहे !

**परिस्थितीला सामोरं जाण्यासाठी आरोग्य विभाग सतर्क**


**!शिरुरकासार(प्रशांत बाफना) : सध्या उष्णतामान एका विशिष्ट वळणावर असुन उष्माघात ही वैद्यकिय आणीबाणी असल्याची जाणीव होऊ लागली आहे यासाठी जरा सांभाळून रहा ,काळजी घ्या असे आरोग्यविभागाकडून आवाहन करण्यात आले असुन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी आरोग्य विभाग सतर्क असल्याचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ अशोक गवळी यांनी सांगितले.**

**उष्णतेचा पारा चाळीसी पार झाला असुन उकाडा सहनशिलतेच्या पलिकडे जात असतांना शेतकरी ,कामगार यांचेसह श्रमाचे काम करणा-यांना काळजी घेण्याची गरज आहे शिवाय सध्या गावोगावी सप्ताह लग्न असे कार्यक्रम सुरू असुन लोकसभेच्या निवडणूकिचा काळ असल्याने प्रचार सभा अशा कार्यक्रमाला जातांना नागरिकांनी सतर्क राहणे गरजचे आहे .**

वैद्यकिय आणीबाणी असल्यागत परिस्थिती असल्याने आरोग्य विभागाकडून काही महत्वपुर्ण सुचना दिल्या जात आहे .उष्णतेचे परिणाम ,लक्षणे व त्यावर तातडीने काळजी कशी घ्यावी याबद्दल संदेश दिला जात आहे .दुपारी बारा ते तीन यावेळेत प्रामुख्याने बाहेर पडणे टाळा ,जास्त उन्हात स्वयंपाक करू नका ,शिळे अन्न खाऊ नका कामगार ,मालक ,मेळावे ,क्रिडा व यावर देखरेख ठेवणा-यांनी खबरदारी घ्यावी ,उष्णतेचा आरोग्यावर घातक परिणामाची शक्यता असते .

प्रौंढासाठी धोक्याची लक्षणे !

दिशाभुल होणे ,गोधळासह ,मानसिक संवेदना आणि चिडचिडेपणा , फेफरे येणे ,कोमात जाणे , डोकेदुखी,चक्कर ,मुर्च्छा ,मळमळ ,उलटी ,हृदयाचे ठोके वाढणे किंवा श्वासाला त्रास होणे असा संभव असतो . लहान मुलांना भुक न लागणे ,आहार घेण्यास नकार ,चिडचिड करणे ,लघ्वी प्रमाण कमी होणे ,तोंड कोरडे पडणे ,डोळे खोल जाणे ,शरीराच्या कोणत्याही भागातून रक्तश्राव होणे , बेशुद्ध पडणे असे प्रकार घडण्याची शक्यता असते .अशावेळी घाबरून न जाता ताबडतोब १०८ नंबरला कॉल करणे व गाडी येईपर्यंत



उष्माघात झालेल्या रूग्णास थंड सावलीत नेऊन मोकळी अथवा पंख्याची हवा देणे ,त्वचेला थंड पाणी अथवा पाण्याने भिजवलेला कपडा असे उपाय करावेत ,जवळच्या आरोग्य केंद्रात उपचारासाठी न्यावे ,आरोग्य कर्मचारी तातडीने उपचार करतील असे ता.आ.अ.डॉ अशोक गवळी यांनी सांगितले .

# साधू-संताच्या संगतीत लाभ मिळतो - दत्ता महाराज गिरी

गेवराई (प्रतिनिधी)

मनुष्य जीवन अनमोल आहे ते व्यर्थ जाऊ देवू नका मनुष्य जन्म पुन्हा नाही म्हणून चांगले कर्म करा तसेच जीवनात संगत फार महत्त्वाची आहे जशी संगत आहे तशी पंगत मिळते. जगाच्या कल्याणासाठी साधू -संत पृथ्वीतलावर जन्म घेत असतात जीवनात साधू- संताच्या सानिध्यात राहिल्याने आनंद तसेच लाभ मिळतो. लाभ हा चांगल्या विचाराच्या पोटी मिळत असतो म्हणून विचारही चांगले ठेवा. चांगल्या लोकांची संगत करा चांगले होते असे प्रतिपादन श्री क्षेत्र गोरक्षनाथ संस्थानचे महंत दत्ता महाराज गिरी यांनी व्यक्त केले.

गेवराई तालुक्यातील सुशी येथील आयोजीत अखंड हरिनाम



सप्ताहात सातवे कीर्तनरुपी पुष्प गुंफताना महंत दत्ता महाराज गिरी बोलत होते. सुखाचे व्यवहारीं सुखलाभ जाला । आनंदें कोंदला मागें पुढें ।।१।। संगती पंगती देवासवें घडे । नित्य नित्य तेंचि साच ।।ध्रु.।। समर्थाचे घरीं सकळ संपदा । नाहीं तुटी कथा कासयाची ।।२।। तुका म्हणे येथें लाभाचिया कोटी । बहु वाव पोटीं समर्थाचे ।।३।। या जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या अभंगावर सुंदर विवेचन केले. यावेळी पंचक्रोशीतील महिला व पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना दत्ता महाराज गिरी म्हणाले की, मानवी जीवन हे सुविचारांसाठी आहे. अविचारी होवू नका. वेळेचा सदुपयोग करा तसेच व्यवहार करताना सज्जनाशी करावा आणि सुखाचा करावा त्याला सुखाचे फळ लागतात तर देवाचे नामस्मरण करा चिंता करु नका, चांगल्यासाठी चांगल्याची संगत करा. वाईटच्या संगतीत राहून व्यसन करु नका, दारु पिवू नका जुगार खेळू नका.बौध्दिक, आर्थिक श्रीमती साठी संगत चांगली ठेवा असा मौलिक सल्लाही त्यांनी शेवटी बोलताना दिला. यावेळी परिसरातील टाळकरी, वारकरी, भजनी मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकनेत्या पंकजाताई मुंडे सर्व समावेशक,सर्व जातीधर्मांना घेऊन जाणारे नेतृत्व- खा.डॉ.प्रीतमताई मुंडे

## पंकजाताईंना केंद्रात मंत्रीपदाची संधी -माजी आ.भीमराव धोंडे

माजी आ.भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली आष्टीत विराट सभा संपन्न; मतदारांचा प्रचंड उत्साह, विजयावर शिक्कामोर्तब!

आष्टी/किरण जावळे

खासदार निधी परत जात नसतो. हे सामान्य ज्ञान ज्या व्यक्तीला (विरोधी उमेदवारांना) माहित नाही. त्यांनी दिशाभुल करु नये.खासदार फंड लप्स होतच नसतो परंतु बेसीक ज्ञान त्यांना नाही हेच विशेष आहे.लोकनेत्या पंकजाताई सन्मानाने लोकसभेत जाण्यासाठी आपले सर्व लक्ष केंद्रित लोकसभा निवडणुकीवर केले पाहीजे.

पंकजाताई मुंडे निवडीसाठी आपण प्रभावी मतदार आहात त्यामुळे त्याला खिंडार पडण्याचे काम विरोधक करत आहेत.तस पाहिले तर निवडणूक खुप सोपी आहे कारण आपण सगळे केंद्र सरकारच्या कोणत्याना कोणत्या योजनेचे लाभार्थी आहोत.त्यामुळे अनेक विकास कामे आपण राबविले आहेत.त्यामुळे हे मतदारांना सांगितले पाहिजे असे सांगून अरे ला कारे म्हणायचे गरज नाही आपण केलेल्या विकास कामाना घेऊन आपण मतदान मागितले की,आपण नक्की विजयी होऊन सर्वाधिक लीड पंकजाताई यांना मिळून त्या विजयी होतील 'असा ठाम विश्वास खा.डॉ. प्रीतमताई मुंडे यांनी आज आष्टी येथील विराट सभेला संबोधित करताना व्यक्त केला. भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ आज गुरुवारी आष्टी येथील मोरेश्वर लान्समध्ये सभा आयोजित करण्यात आली होती.सभेच्या अध्यक्षस्थानी माजी आ.भीमराव धोंडे होते. या सभेत माजी आ.भीमराव धोंडे ,माजी आ.गोविंदराव केंद्रे, दिलीपदादा हंबर्डे,ड.सुधीर घुमरे, ड.साहेबराव म्हस्के,डा. अजयदादा धोंडे,वाल्मिकतात्या निकाळजे,डा.शिवाजीराव शेंडगे, विस्तारक हरीश खाडे,रामराव खेडकर,ड.रत्नदीप निकाळजे, भाऊसाहेब मेटे,बबनआण्णा झांबरे,रघुनाथ शिंदे,बबनराव औटे,अंबादास औटे सर रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे,माऊली पानसंबळ,भाग्यश्री ढाकणे,माजी सभापती सौ. सुवर्णाताई लांबरुड,प्रकाश सोनसळे,दादा जगताप यांची भाषणे झाले तर यावेळी सभेला खा.डा.प्रितमताई मुंडे,माजी आ.गोविंदराव केंद्रे,विजय गोल्हार, सविताताई गोल्हार,सविताताई बडे,सुवर्णाताई लांबरुड,शैलेजा गर्जे अनुरध सानप,माऊली पानसंबळ,भाग्यश्री ढाकणे, शिवाजी नाकाडे,प्रकाश बडे,विठ्ठल बन्सोडे,अरुण सायकड,सईद चाऊस,विष्णूपंत वायभासे,अमोल चौधरी,मधुकर गर्जे,केदार जगताप,

सतीशमामा झगडे,हरिभाऊ जंजीरे, तात्यासाहेब कदम,बाळासाहेब खिळे,प्रकाश कोकणे,पांडुरंग गावडे, सेवानिवृत्त नायब शाहादेव गिते,दिलीपराव काळे,ज्ञानदेव खिळे मुकादम,अभय गर्जे,बाबा ससाणे,बाळासाहेब वाघुले,बापुराव आव्हाड, विठ्ठलराव लांडगे आदि मान्यवर,पदाधिकारी मोठ्या संख्येने होते. खा.डॉ. प्रीतमताई मुंडे आपल्या भाषणात पुढे म्हणाल्या की, खासदार फंड परत जात नाही हे विरोधी उमेदवाराला माहीत नसावे ? आपण कोणी ही जाऊन खासदार निधीची व महिती बीड जिल्हाधिकारी यांच्या नियोजन विभागात जाऊन विचारावी. खासदार निधी परत जात नाही हे माहीत नसणाऱ्यांच्या हातात तुम्ही जिल्ह्याचे सूत्र देणार का ? मी किती निधी खर्चीला आहे .तो मी माझ्या सोशल मिडियावर टाकला आहे. तो दिसत नाही का? आपल्याला मात्र निष्क्रिय खासदार म्हून फक्त व्हायरल करता येते विरोधकाला. मी उमेदवार आहे का? माझ्यावर बोलण्याचे काम काय? पंकजाताई हे सर्वसमावेशक नेतृत्व असून त्या सर्व जातीपातीला सोबत घेऊन जाणार नेतृत्व आहे.

त्यामुळे इतर कोणत्याही गोष्टीकडे लक्ष न देता लोकनेत्या पंकजाताईसारखं खंबीर नेतृत्व पालकमंत्री म्हणुन लाभले होत त्यावेळेस जिल्ह्यातील गावागावात मोठ्या प्रमाणात विकास कामे त्यांनी केले




होते.कार्यकर्त्यांनी फक्त बुथवर थांबून मतदान करून घ्यावे असे आवाहन त्यांनी शेवटी केले. माजी आ.भीमराव धोंडे यांनी धडाकेबाज भाषण केले.आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात त्यांनी विकास कामासंदर्भात व्यापक आढावा घेत संवाद साधला. भीमराव धोंडे म्हणाले की,आपल्या भुमीकेला आष्टी,पाटोदा शिरुर मतदार संघातील जनतेने नेहमी साथ आणि प्रतिसाद दिलेला आहे.

आपण लोकसभा निवडणुकीत ज्याच्याबरोर आहोत त्या उमेदवाराचा विजय तर होतोच शिवाय चांगली लिड दिले जाते असा अनुभव आहे.आ.सुरेश धस हे तालुक्यातील लोकसभेचे उमेदवार होते तरी त्यांच्यापेक्षा जास्त लिड आष्टी मतदार संघाने विशेषता; आष्टी तालुक्याने दिली होती यावरुन आमची ताकत लक्षात घेण्यासारखी आहे हे स्पष्ट होते.

दोन महिन्यापासून प्रचार यंत्रणा!

दोन महिन्यापासुन आम्ही प्रचार करीत असुन दौरे करीत आहोत. पंकजाताई नक्की निवडुन येणार आहेत आणि केंद्रात मंत्री होऊन लोकनेते गोपीनाथरावजी मुंडेसाहेब यांचे अधुरे स्वप्न पुर्ण करतील असे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदीसाहेबांनी पंकजाताई मुंडे यांना बेटी मानले आहे. म्हणुन मोदी त्यांना केंद्रात मंत्री करतील म्हणुन निवडुन दिले पाहिजे.बजरंग सोनवणे आणि पंकजाताई यांची तुलनाच होऊ शकत नाही असा टोलाही भीमराव धोंडे यांनी यावेळी लगावला.मी चार वेळा आमदार झालो आहे.जातीपातीवर काही नसते.तसे असते तर लोकनेते गोपीनाथ मुंडे,मी अथवा प्रितमताई यांना लोकांनी निवडुनच दिले नसते.प्रत्येक गावातील कार्यकर्त्यांनी निवडणुक प्रचार फेरी करावी.म्हणजे वातावरण निर्मिती होऊन मताधिक्य वाढणार आहे.

माणुसकी हीच जात!

आ.सुरेश धस,आ.बाळासाहेब आजबे व आपण पंकजाताई यांचेच मन लावुन काम करीत आहोत.आम्ही माणुसकी हिच जात मानतो.पंकजाताईना चांगले लिड देऊ.मतदार संघातील गट,गण आणि वारीयर्सची बैठक आहे आपण जी भूमिका घेतली आहे त्याला मतदार संघाने पाठींबा आणि लीड दिली आहे.ज्या वेळेस मुंडेसाहेब उभे होते त्यावेळेस मुंडेसाहेबांनी आम्हाला विनंती केली.आम्ही त्यावेळेस भाजपमध्ये नव्हतो तरीदेखील त्यांना साथ दिली,आष्टीचा उमेदवार होता तरी लीड दिली.शेतकऱ्यांना पेन्शन सुरु केली आहे. पुढील काळात याची रक्कमदेखील वाढणार आहे.भविष्यात देखील अनेक योजना राबविल्या जाणार आहेत.

भविष्यात पाणी योजना राबवणार!

भविष्यात पाण्याची योजना देखील प्रभावी राबविण्यांचा आपला मानस आहे.एक रुपयांत विमा या सरकारने भरला आहे.कोणत्याच राज्यात नसून तो फक्त महाराष्ट्रात आहे.आता लोकसभेत पंकजाताई निवडून गेल्यानंतर देखील या प्रश्नासाठी त्या लढतील पंकजाताई केंद्रात गेल्यानंतर नक्कीच तेथे केंद्रात मंत्री होतील. आपल्या जिल्ह्यातील मुंडेसाहेबांनंतर कोणीच मंत्री झाले नाहीत.आता आपल्याला ती संधी आली आहे आणि केंद्रातील अनेक योजना मिळणार आहेत.

त्यामुळेच जातीपातीच न पाहता कमळ चिन्हावर मोहर देऊन पंकजाताई यांना भरघोष मताधिक्य द्यावे.जातीपातीचा विचार आपल्याळडे केला जात नाही.त्यामुळे मागील काळात आपण सगळ्या समाजातील खासदार आपण निवडुन दिले आहेत.दुःखद गोष्ट माझ्या घरात झाल्याने मी पाच दिवसांत प्रचारात जास्त फिरलो नव्हतो.मात्र आता आपण सर्वांनी पूर्ण ताकदीने आपण कामाला लागायचे आहे. जात पात धर्म काहीच नाही. पाहणार नाहीत असे बोलले जात आहे की, मुस्लिम बांधव भाजपा सोबत नाही. या सभेत मुस्लिम बांधव प्रीतमताईंचा सत्कार केला आहे.माणुसकी हीच सर्वश्रेष्ठ जात आहे.देशाला मोदींची गरज आहे.आजदेखील मी आणि माझा कुटूंब माझ्या गावातील पीरसाहेबाचे जाऊन दर्शन घेतो.त्यामूळे जाती पाती न पाहणारे आम्ही आहोत.त्यामुळे सर्वात जास्त मतांनी पंकजाताई निवडून येणार आहेत.जगातील ७६ टक्के लोकांमध्ये मोदींजी लोकप्रियता आहे.मागील निवडणूकित प्रीतमताई यांना आपण लीड दिली तेवढे देखील मते या मतदार संघातुन बजरंग सोनवणे यांना मिळणार नाहीत.आपल्याला पंकजाताईसाठी प्रामाणिकपणे काम करून निवडुन आणायचे आहे.

# तालुक्यातील वनपरिक्षेत्रात पाणवठे कोरडेठाक !

## कडाक्याच्या उष्णतेमुळे पक्षासह वन्यजिव तडफडून मरतील ? वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना गांभीर्य आहे की नाही!

## साहेब ! पाणवठ्यात चिमणीची चोच बुडेल येव्हडे सुध्दा पाणी नाही वो !

शिरुरकासार (प्रतिनिधी) सध्या उष्णतेचा पारा चाळीसी पार करत असुन अंगाची लाही लाही होत असल्याने तहाण भागवण्यासाठी पाण्याचा वापर अधिक होत असतांना वनपरिक्षेत्रात वन्यजिवासाठी वनविभागाकडून उभारलेले पाणवठे कोरडे ठाक असल्याचे चित्र मंगळवारी दुपारी दिसून आले ,पाणवठ्यात चिमणीला चोच बुडेल येव्हडे सुध्दा पाणी नसल्याने साहेब पक्षासह वन्यजिव तडफडून मरतील वो ! अशी भिती व्यक्त केली जात आहे .

उन्हाळा आला की डोंगर दरीतील झुळझुळ वाहणारे पाणी आटून जाते ,अशावेळी वन्यजिवांना तहान भागवण्यासाठी वनपरिक्षेत्रात पाणवठे वनविभागाने तयार केलेले आहेत ,जेणेकरून वन्यजिवांना पाण्यासाठी भटकंती करण्याची गरज भासणार नाही ,तसेच पाण्याच्या शोधात लोकवस्तीकडे येण्याची सुध्दा वेळ येऊन त्यांच्या जिवाला त्रास होणार नाही मात्र त्यासाठी उभारलेल्या पाणवठ्यात पाणी सतत भरलेले असणे गरजेचे असते ,हे पाणवठे टँकरद्वारे भरले जात असतात मात्र मंगळवारी भरदुपारी दहिवंडी वनपरिक्षेत्रात असलेल्या पाणवठ्यात थेंबभर पाणी नसल्याचे विदारक चित्र दिसून आल्याने कडक उष्णतामानामुळे व पिण्यासाठी पाणी न मिळाल्याने वन्यजिव तडफडून मरतील अशी भिती व्यक्त केली जात आहे .

या पाणवठ्यात पाणी भरून ठेवण्याची नैतीक जबाबदारी नव्हे कर्तव्यच असलेला वनविभाग याकडे फारसे गांभिर्याने पहात नसल्याचे चित्र स्पष्टपणे दिसुन आले ,दहिवंडीतील या पाणवठ्यासारखे अन्य परिक्षेत्रात देखील पाणवठे असतील जर लोक रहदारीच्या नजरेखाली असलेल्या पाणवठ्यातच पाणी नाही तर अन्य सुनसान वनपरिक्षेत्रातील पाणवठ्यात पाणी असेल का ? अशी शंकाही व्यक्त केली जात आहे .

पानवठ्याची साफसफाई केल्यानंतर पाणीपुरवठा केला जातो तालुक्यात एकूण ११ पानावर असून उद्यापासून पाणीपुरवठा सुरळीत केला जाईल व याची स्थानिक माहिती वनमजूर देतील अजय देवगुडे- वनपाल पाटोदा व शिरूर या साठी एकाच टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो तसेच संबंधित प्रकाराबाबत माहिती घेऊन उद्यापासून टँकरचा पाणीपुरवठा पाणवठ्यावर सुरळीतपणे करण्यात येईल



**नागरेवाडी येथील एका विहिरीत कोल्हा पाण्यासाठी मंगळवारी भटकंती करत असतांना पडला होता त्यास सर्पराज्ञीचे संचालक सिध्दार्थ सोनवने व वनमजुर शिवाजी आघाव सह ग्रामस्थांनी विहिरी बाहेर काढले असून असे हजारो वन्यजीवाची पाण्यासाठी भटकंती असून किती वन्यजीवनाना मरण यातना भोगल्या लागत आहे.**

१५ ते २० दिवसापासून वन विभागाला याविषयीची कल्पना दिलेली आहे. मात्र वन विभागाकडून आज उद्या आज उद्या करत पाणी टाकण्यास टाळाटाळ करत आहेत. या एक-दोन दिवसात जर पानी पानवट्यातमध्ये टाकले गेले नाही तर वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना पानवटाच्या शेजारीच भर उन्हामध्ये झाडाला बांधून टाकण्यात येणार .आणि त्यांनाही अन्न आणि पाण्याशिवाय कशी जीवाचे हाल हाल होतात हे जाणीव करून दिली जाणार.

### तालुक्यातील वनपरिक्षेत्रात एकूण सात पानवठे असून उद्यापासून सुरळीतपणे पाणीपुरवठा केला जाईल राजेश जोशी –वनरक्षक

वनपाल व वनरक्षक यांच्या पानवठयाच्या आकड्याबाबतच गोंधळ वनरक्षक ७ तर वनपाल ११ असे पानवठे सांगत आहेत यामध्ये दहिवडी राक्षसभवन बरगवाडी झापेवाडी हटकरवाडी अशा वनपरिक्षेत्रात पानवठे असून यातही पाणी आहे की नाही ही मोठी शंका निर्माण झाली आहे यामुळे वन्यजीवांच्या जीवाला धोका असून वन्य जीवाचे पाण्यासाठी लाही लाही होऊन तरफडून मृत्यू होण्याची दाट शक्यता असतानाही वन विभागाचे अधिकारी कर्मचारी मात्र उंटावरून शेळ्या हाकताना दिसत आहेत त्यांना या गोष्टीचे कुठलेही गांभीर्य अधिकारी ,कर्मचारी यांना असताना दिसत नाही हीच मोठी शोकांतिका. पानवट्याची साफसफाई केली असेल सांगत असले तरीही प्रत्यक्षात पानवठ्यात कचरा दिसत आहे.




## वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या प्रचार रथावर अज्ञाताचा हल्ला

बीड (प्रतिनिधी)
बीड लोकसभा निवडणुकीचा प्रचार हा ४८ तासात थंडावणार आहे यासाठीच उमेदवार मोठ्या ताकतीने आप आपला प्रचार करताना पाहायला मिळतात मात्र वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या प्रचारार्थ अंबाजोगाई शहर वर लावलेले बॅनर आणि शहरात फिरत असलेले प्रचार रथ यांच्यावर अज्ञातांनी हल्ला चढवत पोस्टर फाडाफाडी केली आहे.

बीड जिल्ह्यात प्रचारांची रणधुमाळी चालू असतानाच प्रत्येक जण आपल्या विरुद्ध उमेदवारावर शाब्दिक हार प्रहार करत आहे मात्र या सगळ्या गोष्टीला आता हिंसक वळण लागल्याचं पाहायला मिळते वंचित बहुजन आघाडीचे अंबाजोगाई शहरात लावलेले फलक हे फाडण्यात आले आहे आणि प्रचार अर्थ फिरत असलेला प्रचार रथ यावर हल्ला करत यावरील वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा अँड.प्रकाश आंबेडकरांची फोटो हे फाडण्यात आले आहे यामुळे अंबाजोगाई शहरात काही वेळासाठी वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते संतापलेले पाहायला मिळत होते मात्र यावर लवकरात लवकर पोलीस प्रशासनाने या समाजकंटकांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते हे करत आहेत अन्यथा जशास तसे उत्तरही आम्ही देऊ शकतो असंही यावेळेस भूमिका वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी मांडली आहे.

# शेख निजाम मुळे भाजपला दानका बसणार एक गट्टा मुस्लिम समाज बजरंग यांच्या पाठीशी

### एक हातात कुराण तर दुसऱ्या हातात संविधान घेऊन मुस्लिम समाज लोकशाहीचे संरक्षण करीत आहात:अजिंक्य चांदणे
### बीड शहर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे चे शेख निजामचे वतीने आयोजित केलेल्या सभा बजरंग सोनवणे विजयाची साक्षीदार ठरणार ...अशोक येडे





बीड (प्रतिनिधी)
देशासाठी नेहमी बलिदान देणारा मुस्लिम समाज लोकशाहीचे संरक्षण साठी एक हातात कुराण तर दुसऱ्या हातात संविधान घेऊन मैदानात उतरल्याने भारतीय जनता पक्ष चे पायाखालची वाळू सरकली आहे कोणत्याही परिस्थितीत भाजप येणार नाही हे आता ठरले असून येत्या १३ मे रोजी आपल्या जिल्ह्यात होणारे निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन डीपीआयचे अजिंक्य चांदणे यांनी केले.


शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे चे शहर प्रमुख शेख निजामचे वतीने बीड शहरात महाविकास आघाडीचे प्रमुख पक्षांचे जाहीर सभा व कॉर्नर बैठकीचे आयोजन केले जात असून या या सर्वांना मतदाराकडून प्रतिसाद दिला जात आहे काल शहरातील इस्लामपुरा भागाचे बाबा चौक या ठिकाणी महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांचे प्रचारार्थ जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी माजी मंत्री सुरेश नवले ,माजी आमदार सिराज भाई देशमुख ,राष्ट्रवादी काँग्रेसची प्रमुख नेत्या सुशीलाताई मोराळे, समाजवादी पक्षाचे जिल्हा अध्यक्ष खमरुल इमान खान, आम आदमी पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे, प्रा. पंडित तुपे, संयोजक शेख निजाम,शप्पो दादा,इम्तियाज मनियार,खय्युम इनामदार इस्लामपूर, व भागातील युवा उपस्थित होते यावेळी मार्गदर्शन करताना शिवसेना शहर प्रमुख निजाम यांनी निवडणुकीचे महत्त्व या विषयावर उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले व येणारे १३ तारखेला रोजी तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हा समोरील बटन दाबून बजरंग सोनवणे यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले राष्ट्रवादी काँग्रेसची प्रमुख नेत्या सुशीलाताई मोराळे यांनी यावेळी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर शाब्दिक हल्ला करून सांगितले की मोदी यांनी पंतप्रधान पदाची गरीमा राखून ठेवली नाही एका पंतप्रधानाला जातीयवादी पसरणे शोभत नसून असे लोकांचे हातात देश असणे घातक आहे म्हणून चार जून रोजी तुतारी अशी वाजवायची की कमल देशभरात संपला पाहीजे यावेळी मार्गदर्शन करताना माजी आमदार सिराज राज देशमुख यांनी महाविकास आघाडी व इंडिया गटबंधन देशात सत्ता स्थापन करणारा हात यंदा परिवर्तन होणार असून नागरिकांनी हातात घेतलेली निवडणूक सांभाळून घ्यावी व १३ तारीख रोजी बजरंग सोनवणे यांचे नावासमोरील बटन दाबून प्रचंड मताने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले यावेळी बोलताना डीपीआयचे अध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी सांगितले की सध्याचे वातावरण मुस्लिम आणि संविधान विरोधी आहे देशात जे चालले आहे ते योग्य नाही ज्या ज्या वेळे देशावर संकट आले सर्वप्रथम मुस्लिम समाजाने आपले योगदान दिले असून आजच्या काळात लोकशाही धोक्यात असल्याने मुस्लिम समाजाने एका हातात कुराण तर दुसऱ्या हातात संविधान घेऊन रक्षण करण्याची जबाबदारी घेतल्याने भाजप सरकार चिंतेत दिसून येत आहे म्हणूनच पंतप्रधान सारखे वरिष्ठ नेता खालची पातळी गाठून विरोधी भाषा करीत आहे परंतु देशाचे नागरिकांना भाजपाची नीती व नियत लक्षात आली असून यंदा भाजपाला सत्ता परिवर्तन पहावेच लागणार आहे सर्वांनी मिळवून ठरविल्याने ही निवडणूक नागरिकांचे हातात दिसून येत आहे येणारे १३ मे रोजी मशीन क्रमांक एकवर दोन नंबर वर बजरंग सोनवणे यांचे निवडणूक चिन्ह व नाव आहे यांच्या समोरील बटन दाबून आपण सर्वांनी आपला माणूस शेतकरी पुत्र संसदेत पाठवावे असे आवाहन केले तर माजी मंत्री सुरेश नवले यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की जेव्हा विकास आणि कार्याची विचारणा केली जाते त्या ठिकाणी भाजप जातीवादी तपासून आपले मार्ग मोकळे करण्याचे प्रयत्न करीत आहात परंतु नागरिकांना भाजप काय आहे आणि काय करतात हे लक्षात आले आहे बीड जिल्ह्यात भाजपाचे लोक त्यांचे उमेदवारांना पडणार असल्याची चर्चा येत आहे आहे म्हणूनच पंतप्रधान आले परंतु राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहून उमेदवार पाडयाची सिग्नल जिल्ह्याचे सांगून गेलेत त्यांनी राहिलेले दिवस सुबोरीने काढून महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांना बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले यावेळी समाजवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष खमरूल ईमान आम आदमी पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे इस्लामपूरा भागाचे युवा नेतृत्व इम्तियाज मणियार ,शेख सरफराज, खय्युम इनामदार यांनीही मार्गदर्शन केले शेख निजाम यांचे मार्गदर्शनाखाली या जाहीर सभेला यशस्वी करण्यासाठी सय्यद फहीम , शेख अक्रम, इम्तियाज मणियार ,शेख शप्पो,खय्युम इनामदार, आदींनी परिश्रम केले

### पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी माजलगावांत

## सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे महायुतीचे आवाहन; गडकरींच्या सभेने पंकजाताईंच्या विजयी मताधिक्यात होणार वाढ !

माजलगाव (प्रतिनिधी)
भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ केंद्रीय मंत्री विकासपुरुष नितीन गडकरी यांची माजलगाव येथे उद्या शुक्रवारी दुपारी जाहीर सभा होणार आहे. या जाहीर सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भाजपा महायुती प्रचार समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

भाजप महायुतीच्या बीड लोकसभा मतदारसंघाच्या लोकप्रिय उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांची सुरुवातीपासूनच प्रचारात प्रचंड आघाडी घेतलेली असुन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी अंबाजोगाई येथे सभा झाली. त्यानंतर आता माजलगाव येथे विकासपुरुष केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे खास पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी येत आहेत. शुक्रवार, दि. १० मे २०२४ रोजी दुपारी १२:०० वा. जुना मोंढा, येथे ही सभा होणार आहे. सबका साथ सबका विकास सूत्र डोळ्यासमोर ठेऊन, गरीब कल्याणाचा रथ मोदी सरकारने हाती घेतला.भाजप सरकारच्या मंत्रिमंडळातील



कार्यकुशल प्रमुख मंत्री व विकासपुरुष म्हणून ज्यांची ओळख आहे.ज्यांच्या मुळे देशभरात ऐतिहासिक महामार्गांचे महत्त्वकांक्षी प्रकल्प व रस्त्यांचे जाळे निर्माण झाले आहे. नवनवीन विकास संकल्पना कार्यान्वित झाल्या आहेत.असे नितीन गडकरी हे पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी बीड जिल्ह्यात येत आहेत. माजलगाव येथे होणारे या जाहीर सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भारतीय जनता पक्ष महायुती प्रचार समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## नरेंद्र मोदींच्या ऐतिहासिक विजयात पंकजाताईंचा गुलाल उधळणार -इंजि. महेश सावंत

बीड (प्रतिनिधी)
देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत देशाचा चेहरा बदलून टाकला. देशातील शेवटच्या घटकांपर्यंत विकास आणि न्याय देण्याचे प्रामाणिक काम नरेंद्र मोदी सरकार द्वारे चालू आहे. शेतकरी सन्मान योजना, हर घर नल योजना, प्रधानमंत्री आवास योजना अशा अनेक योजनांमुळे सामान्य जनतेला मूलभूत सुविधा मिळत आहे.

धर्म जात पंथ याच्या पलीकडे जाऊन विकासाचे राजकारण सर्वांच्या हितासाठी आहे. लोकशाहीमध्ये धोरण आणि विकास निश्चित करण्यासाठी लोकसभेची निवडणूक असते. विकास आणि देश हित समोर ठेवून पुन्हा एकदा मोदी सरकार स्थापन करण्याचा निश्चय देशभरातील नागरिकांनी घेतला. त्याप्रमाणे बीड जिल्ह्याचे विकासाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी खंबीर नेतृत्व पंकजाताई मुंडे यांना प्राधान्य दिले पाहिजे. भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातील नागरिकांशी संवाद साधून मतदार बांधवांना पंकजाताईंना पाठिंबा देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. जनतेचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे. फिर एक बार मोदी सरकार पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या या ऐतिहासिक विजयात पंकजाताईंच्या विजयाचा निश्चितपणे उधळला जाणार हा निर्धार पुर्ण करण्यासाठी मतदार बंधू आणि भगिनींनो जातीयतेला थारा न देता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व बळकट



करण्यासाठी बीड मधून पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना प्रचंड मताने निवडून द्यावे असे आवाहन इंजि. महेश सावंत- जिल्हाध्यक्ष, अभियंता सेल भाजपा यांनी केले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT